ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शेती वित्तपुरवठयाचे स्त्रोत आणि महत्व

**प्रा. सुप्रिया दिनानाथ पावसकर** एम.ए समाजशास्त्र ,बीएड मोहिनी मुरारी मयेकर कला व वाणिज्य महाविद्यालय चाफे, रत्नागिरी मो.नं. : 9420186069 mangeshbhosale.07@gmail.com

## प्रस्तावना

कोणताही व्यवसाय करण्यासाठी वित्तपुरवठा महत्वाचा असतो. त्याचप्रमाणे शेती व्यवसाय करण्यासाठी देखील वित्तपुरवठा महत्वाचा आहे. वित्तपुरवठयाचे अनेक स्त्रोत उपलब्ध असल्याचे आपणास दिसून येते. शेतीला योग्य प्रमाणात भांडवल प्राप्त झाले तरच शेती क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते. असे श्रीमती विरा इन्सटे यांचे मत आहे. यांनी भारतीय शेतीच्या मागासलेपणाची दोन कारणे सांगितली आहेत, त्यात भांडवलाचा अभाव आणि शेती व्यवसायातील मागासलेपणा यांचा समावेश आहे.

वित्तपुरवठा शेती पध्दतीत व उत्पादनात आमूलाग्र बदल घडवून आणतो. शेती व्यवसायात विविध कारणांसाठी कर्जाची गरज असते .हि गरज भागविण्याच्या दृष्टिने वित्तपुरवठा स्त्रोतांचे अनन्य साधारण महत्व आहे. शेती वित्तपुरवठयाचे अनेक स्त्रोत आहेत .

**उद्दिष्टे :–**

1) शेतीतील वित्तपुरवठा स्त्रोताचा अभ्यास करणे .
2) वित्तपुरवठा स्त्रोताचे शेती व्यवसायातील महत्व अभ्यासणे .

**संशोधनाची पध्दती :–** दुय्यम स्त्रोत

**माहिती विश्लेषण :–**

**शेतीतील वित्तपुरवठा स्त्रोत :–**

शेतीला लागणारा कर्जपुरवठा वेगवेगळया स्त्रोतांव्दारे केला जातो. या स्त्रोतांना शेतीसाठी कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था असे देखील म्हटले जाते. या पुढील स्त्रोतांचा विचार केला जातो .

**वित्तपुरवठा स्त्रोत**

**अ) खाजगी स्त्रोत**

1) सावकार
2) व्यापारी व दलाल
3) नातेवाईक व मित्र
4) जमीनदार व इतर

**ब) संस्थात्मक स्त्रोत**

1) सरकार
2) व्यापारी बँका
3) भारतीय स्टेट बँक
4) भारतीय रिझर्व्ह बँक
5) भूविकास बँक
6) अग्रणी बँक योजना
7) विभागीय ग्रामीण बँक
8) नाबार्ड
9) सहकारी संस्था

अ) प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था
ब) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
क) राज्य सहकारी बँक

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**अ) खाजगी स्त्रोत :–**

जेव्हा शेतक-याला केला जाणारा कर्ज पुरवठा व्यक्तिगत स्वरूपाचा असतो , तेव्हा त्याला खाजगी स्त्रोत म्हटले जाते . यालाच परंपरागत किंवा बिगर संस्थात्मक स्त्रोत म्हटले जाते . यात सावकार ,व्यावसायिक निधी, चिट फंड, नातलग, घाऊक आणि किरकोळ व्यापारी, कमिशन एजंट यांचा समावेश होतो . यात सावकार महत्त्वाचा मानला जातो .

**1) सावकार :–**

डॉ. एल. सी. जैन यांच्या मते "सावकार अशी व्यक्ती की, जी आपल्या ग्राहकांना वेळोवेळी कर्ज देते. " यू. पी. बँकिंग समितीने "सावकार ही उदार व्यक्ती नसून पैसा कमविणे हा त्याचा उद्देश असतो. " असे मत व्यक्त केले

प्रा. हॅमिल्टन म्हणतात "गावात बरेच बँकर आहेत, परंतु एकही बँक नाही. "ग्रामीण भागात पतपुरवठा करण्याच्या बाबतीत सावकारची भूमिका महत्त्वाची आहे. शेतक-याना देण्यात येणा-या कर्जात यांचा वाटा 1950–52 मध्ये 70% किंवा त्याही पेक्षा जास्त होता. एकूण कर्जपुरवठयात लहान खेडयात सावकारांचा सहभाग 100% असण्याची शक्यता नाकारता येत नाही. 1937 पासून सावकारांच्या व्यवसाया वर नियंत्रण आणले. याचाच परिणाम म्हणून सावकारी व्यवसायात 1981 मध्ये 16% एवढी घट झाली.

**2) व्यापारी व दलाल :–**

जेव्हा शेतक-याला व्यापारांकडून कर्जपुरवठा केला जातो, तेव्हा त्याला व्यापा-याव्दारे शेतीला कर्ज– पुरवठा असे म्हटले जाते. पिकापूर्वी दिलेले हे कर्ज व्याजासह शेतक-यांच्या हंगामातील पिकातून वसूल केले जाते. सन 1951–52 मध्ये एकूण कर्जात या कर्जाचे प्रमाण 5. 5% होते. 1981–82मध्ये 3. 2 % झाले. सदय परिस्थितीत हे प्रमाण 2% किंवा त्यापेक्षाही कमी असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**3) नातेवाईक व मित्र :–.**

जेव्हा शेतक-याची आर्थिक गरज त्याच्या नातेवाईक व मित्रांकडून पूर्ण केली जाते, तेव्हा त्यास नातेवाईक व मित्रांच्या मार्फत पूरविले जाणारे कर्ज असे म्हटले जाते. शेतकरी तातडीच्या कर्जाची गरज नातेवाईक व मित्रांकडून पूर्ण करतो.

**4) जमीनदार व इतर :–**

ग्रामीण भागातील हा एक महत्त्वाचा आणि खात्रीचा, इतर स्त्रोतांपासून वेगळ असणारा कर्जपुरवठयाचा स्त्रोत मानला जातो. जमिनदाराकडे असलेल्या शेतीचे क्षेत्रफळ आणि सर्व शेती लागवडी खाली आणण्याची क्षमता जमीनदार आपल्या जमिनीचे पोटहिस्से करून कुळांना ती शेतजमीन कसण्यासाठी देतात. शेतजमीन कसण्यासाठी कुळांकडे पैसे किंवा भांडवल नसल्याने जमीनदारांकडून कुळांना शेतजमीन कसण्यासाठी कर्जपुरवठा केला जातो. ग्रामीण कर्ज पुरवठयामध्ये जमीनदारांचे एकूण कर्ज पुरवठयातील प्रमाण 1951–52 मध्ये 3.3% होते, तर 1961–62 मध्ये 14.5% होते. 1971 मध्ये हे प्रमाण कमी होऊन 8.8% झाले व आता हे प्रमाण 4 ते 5% असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**ब) संस्थात्मक स्त्रोत :–**

जेव्हा शेतीसाठी वेगवेगळया संस्थांमार्फत कर्जपुरवठा केला जातो. तेव्हा त्यास संस्थात्मक कर्जपुरवठा असे म्हणतात. यामध्ये वेगवेगळया व्यापारी बँका, सहकारी संस्था, सरकार यांचा समावेश होतो. हा कर्जपुरवठयाचा स्त्रोत निर्माण करण्यामागे शासनाचे एक उद्दिष्टे होते ते म्हणजे खाजगी स्त्रोतांमार्फत शेतक-यांची होणारी पिळवणूक थांबविणे व शेतक-यांना संस्थात्मक मार्गाने कर्ज पुरवठा करणे. सन 1984–85 मध्ये या स्त्रोतांमार्फत दिले जाणारे कर्ज 6230 कोटीचे होते, तेच 2005–06 ला 1,80,480 कोटी रूपयाने वाढ झाली.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

1) **सरकार :—**

जेव्हा सरकारकडून शेतक—यांना कर्जपुरवठा केला जातो, तेव्हा त्यास तकावी कर्ज म्हटले जाते. सरकारकडून शेतक—यांना दिले जाणारे कर्ज हे बैल खरेदी, बी—बियाणे खरेदी, खते आणि रसायने—कीटकनाशके—पंप इ. खरेदी करण्यासाठी तसेच शेतीतील इतर कायमस्वरूपी सुधारणा करण्यासाठी दिले जाते. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सरकारकडून शेतक—यांना आर्थिक मदत केली जाते. मात्र या संदर्भात असे म्हणता येईल की, सरकारकडून शेतक—यांना मिळणारा कर्जपुरवठा आणि त्याबाबतचे प्रमाण अतिशय कमी किंवा नगण्य असल्याचे दिसून येते .

2) **व्यापारी बँका :—**

ग्रामीण भागात शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी व्यापारी बँकांची स्थापना झाली. यात सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, पंजाब नॅशनल बँक, देना बँक, कॅनरा बँक , बँक ऑफ महाराष्ट्र, अलाहाबाद बँक, सिंडिकेट बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, युनायटेड कमर्शियल बँक , इंडियन ओव्हरसीज बँक इ. चा समावेश होतो. या बँकाना राष्ट्रीयकृत बँका म्हणतात. 19 जुलै 1969 ला 14 व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. व्यापारी बँकांच्या एकूण कर्जपुरवठयापैकी शेतीसाठी कर्जपुरवठयाचे प्रमाण आणि व्यापारी बँकांचा विस्तार लक्षणीय आहे .

**व्यापारी बँकांचा शाखांचा विस्तार दर्शविणारी सारणी**

| वर्ष | एकूण शाखा | ग्रामीण शाखा |
|---|---|---|
| 1991 | 60190 | 33990 |
| 1995 | 62360 | 36800 |
| 1997 | 63277 | 37900 |
| 1998 | 66252 | 38400 |
| 2001 | 67372 | 41927 |
| 2003 | 68243 | 43586 |
| 2006 | 69415 | 44154 |

**कर्जव्यवहार दर्शविणारी सारणी**

| वर्ष | एकूण ठेवी कोटी रू. |
|---|---|
| 1950—51 | 580 |
| 1970—71 | 4690 |
| 1980—81 | 21960 |
| 1990—91 | 116300 |
| 1995—96 | 240000 |
| 2006—07 | 327000 |

3) **भारतीय स्टेट बँक :—**

इंपीरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून तिचे स्टेट बँकेत रूपांतर केल्यानंतर भारतीय स्टेट बँकेने शेती व्यवसायाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर्जपुरवठा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. शेती लागवडी योग्य बनविण्यासाठी ते पेरणी, मळणी, साठवण, वाहतूकीपर्यंतच्या सर्व कारणांसाठी स्टेट बँक विक्तपुरवठा करते.

4) **भारतीय रिझर्व्ह बँक :—**

रिझर्व्ह बँकेने शेती क्षेत्रात विकास घडवून आणण्यासाठी स्वतंत्र कृषी पतपुरवठा विभागाची स्थापना केली. शेती व्यवसायाच्या विक्तपुरवठयाचा सखोल अभ्यास करून सहकारी बँका , भूविकास बँका , व्यापारी बँका यांना मार्गदर्शन केले जाते .सन 2005—06 मध्ये रिझर्व्ह बँकेने 15220 कोटी रूपयांचा कर्जपुरवठा केला दृ

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**5) भूविकास बँक :–**

शेतीला रास्त दराने दीर्घकालीन कर्जपुरवठा करण्यासाठी या भूविकास बँकेची स्थापना करण्यात आली. याची रचना व्दिस्तरीय असते. या बँकांचे भांडवल स्वतः च्या भागभांडवलातून उभारले जाते . शेतजमिनीच्या तारणावर बँका शेतक−यांना दीर्घकालीन कर्जपुरवठा करतात. कर्जाची मुदत 5 ते 25 वर्ष ऐवढी आहे. सन 1997–98 मध्ये भूविकास बँकेकडून 3640 कोटी रूपयांचा कर्जपुरवठा केला.

**6) अग्रणी बँक योजना :–**

व्यापारी बँकांनी कर्ज देताना क्षेत्रीय दृष्टिकोनाचा विचार करावा या शिफारशीतून सन 1969 अखेरीस अग्रणी बँक योजना जाहिर केली. देशातील 380 जिल्हयांना ही योजना लागू केली. 2004–05 मध्ये अग्रणी बँक योजनामार्फत 5700 कोटी रूपयांचा कर्जपुरवठा केला .

**7) विभागीय ग्रामीण बँक :–**

शेतक−यांना व लघु उदयोगांना सुलभ कर्ज देण्याच्या हेतूने 2 ऑक्टोबर 1975 मध्ये 5 जिल्हयात, 5 विभागीय बँका सुरू करण्यात आली. या बँका सवलतीच्या दराने कर्जपुरवठा करतात. यांच्याकडे 43,220 कोटी रूपयांच्या ठेवी असून त्यानी 18,370 कोटी रूपयांचा कर्जपुरवठा केला आहे.

**8) नाबार्ड :–**

यालाच शेती आणि ग्रामीण विकासाकरिता राष्ट्रीय बँक म्हणतात. ग्रामीण कर्जपुरवठयाचा व्याप खूप वाढल्याने ग्रामीण क्षेत्रात काम करणा−या संस्थांना सल्ला व मदत करण्यासाठी एक शिखर संस्था असावी, असा विचार मांडण्यात आला त्याला मुर्त स्वरूप येऊन जुलै 1982 मध्ये भारतीय संसदेने कायदा करून नाबार्डची स्थापना केली. नाबार्ड कडून 1998–99 मध्ये 38,050 कोटी ऐवढ कर्जपुरवठा केला.

**9) सहकारी संस्था :–**

सहकारी पतपुरवठा हा सर्वात सर्वोत्तम असा ग्रामीण कर्जपुरवठयाचा मार्ग आहे. भारतीय सहकारी बँकांची रचना त्रिस्तरीय असून पिरॅमिडच्या आकाराची आहे. सन 2005–06 सहकारी बँकांनी 39,400 कोटी रूपयांचा कर्जपुरवठा केला.

**अ) प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था :–**

शेतक−यांना अल्प मुदतीचा कर्जपुरवठा करता यावा यासाठी स्थापन करण्यात आलेली संस्था म्हणजे प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था होय. खेडयांतील 10 पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येऊन अशा सहकारी संस्था स्थापन करू शकतात. भारतात 1904 पासून या संस्था सुरू झाल्या.

**ब) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक :–**

या बँका म्हणजे जिल्हा पातळीवरील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचा संघ होय. सध्या 369 जिल्हा मध्यवर्ती बँका असून सन 2001–02 मध्ये 56650 कोटी रूपयांचा पतपुरवठा करतात.

**क) राज्य सहकारी बँक :–**

राज्यातील सर्व मध्यवर्ती सहकारी बँका व इतर सहकारी संस्थांना त्यांच्या कार्यात मदत करण्याच्या हेतूने राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक स्थापन केल्या गेल्या. मध्यवर्ती सहकारी बँक , प्राथमिक शेती पतपुरवठा संस्थांना 34220 कोटी कर्जपुरवठा करतात. या सहकारी चळवळीचे मार्गदर्शक मित्र व आधारस्तंभ म्हणून कार्य करतात.

**शेती वित्तपुरवठयाचे महत्व :–**

**1) नवीन उत्पादनासाठी :–**

शेतीमधून हंगामानुसार पीक घेतले जाते. पिकाचे उत्पादन करण्यापूर्वी शेतीची मशागत करणे गरजेचे असते आणि याचसाठी शेतीच्या पूर्वमशागतीसाठी , बी–बियाणे खरेदीसाठी आणि इतर औजारे खरेदीसाठी शेतक−यांना भांडवलाची गरज असते. पर्यायाने शेतीला वित्तपुरवठा महत्वाचा आहे दृ

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**2) शेतीच्या विकासासाठी :–**

शेतीच्या विकासासाठी विविध कार्य हाती घ्यावी लागतात . याशिवाय उत्पादन घेता येत नाही. विहीर खोदणे, कुंपण घालणे, सिंचनाची व्यवस्था करणे, सपाटीकरण करणे यासर्व बाबी शेतीच्या विकासासाठी गरजेच्या आहेत . यादृष्टीने शेतीला वित्तपुरवठा महत्वाचा आहे.

**3) अनुत्पादक कारणासाठी कर्जपुरवठा :–**

दैनंदिन उपभोगाशिवाय इतर अनुत्पादक कार्यासाठी शेतक-यांना भांडवलाची गरज असते . यामध्ये विवाह , बारसे, कुटूंबातील व्यक्तीचे निधन , न्यायालयीन भांडणासाठी करावा लागणारा खर्च इ. अनुत्पादक कारणासाठी शेतक-यांना भांडवलाची गरज असते . यादृष्टीने वित्तपुरवठा महत्वाचा आहे .

**4) आकस्मिक कारणासाठी कर्जपुरवठा :–**

अनेक वेळा शेतक-यांना अनपेक्षित घटनांना तोड दयावे लागते. आकस्मिक कारणांमध्ये नैसर्गिक आपत्तीचा समावेश होतो. पाऊस न पडणे , अतिवृष्टी होणे, पिकाची वाढ कमी होणे , पिके वाहून जाणे , कीड पडणे इ. मधून मार्ग काढण्यासाठी शेतक-यांना वित्तपुरवठा महत्वाचा आहे.

**समारोप :–**

आज भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान मोलाचे आहे देशाची वाढती लोकसंख्या ,होत असलेले शहरीकरण तसेच शेती उत्पादनातील विषमता यामुळे अन्न धान्याच्या ज्या समस्या निर्माण होतात. त्या टाळण्यासाठी विशेषत : विविध विक्तीय संस्थातून केला जाणारा विक्तपुरवठा शेती क्षेत्राच्या विकासात महत्व पूर्ण अशी भूमिका बजावताना दिसतो.. त्यामुळे याविक्तय संस्थेतून योग्य सहकार्य शेती व्यवसायास मिळल्यास भविष्यात देशातील शेतक-यांचे प्रश्न आणि त्यातून त्याच्या होणारी आत्महत्या याचे प्रमाण निश्चितच कमी होईल असे मला वाटते, आणि यासाठी केवळ सरकारनेच किंवा मग सर्व सामान्य जनतेनेच प्रत्येतन केले पाहिजेत असे नाही. तर मला वाटते कि, देशाला शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वानी एकत्र येणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**

1) शेतीचे अर्थशास्त्र–सिध्दांत आणि धोरण = डॉ. गंगाधर वि. कायंदे–पाटील
2) भारतीय कृषी अर्थव्यवस्थेचा विकास = प्रा. देसाई , प्रा. लिमये
3) शेतीचे अर्थशास्त्र (एम.ए भाग 1) .= प्रा. देसाई , प्रा. लिमये
4) www.google.com